अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यातील खाजगी / शासकीय संस्थांना नवीन तंत्रनिकेतन सुरु करण्यास <u>मान्यता देण्याबाबत</u>

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र. मान्यता-२०१०/प्र.क्र.२१९/१०)/तांशि-५,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ३० जून, २०१०.

संदर्भ :- अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम क्षेत्रिय कार्यालय, मुंबई यांचे
क्र. एफ २२/३०१५/२०१०/(DIP-ENGG), दिनांक ३० जून, २०१० चे पत्र

**शासन निर्णय:-** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधीन पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ करिता सोबतच्या विवरणपत्रात नमूद केलेल्या एकूण ८७ खाजगी संस्थांना नविन तंत्रनिकेतन सुरु करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन त्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. आता या शासन निर्णयाद्वारे सोबतच्या विवरणपत्र अ येथील स्तंभ २ मध्ये दर्शविलेल्या संस्थांना स्तंभ ३ व ४ मध्ये नमूद केलेले अभ्यासक्रम व प्रवेशक्षमतेसह खालील अटी व शर्तीवर शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ पासून नविन तंत्रनिकेतन सुरु करण्यास शासन याद्वारे मान्यता देत आहे.

१) सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.
२) सदर अभ्यासक्रमांसाठी संस्थेची प्रवेशक्षमता सोबतच्या विवरणपत्र अ मध्ये दर्शविलेल्या स्तंभ ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मर्यादित राहील.
३) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक टीईएम ३३८२/११९८३६/(१९०)/तांसि-१(आ) दिनांक २९ मे, १९८३ अन्वये विना अनुदान तंत्र शिक्षण संस्थांना परवानगी देण्यासाठी विहित केलेल्या अटी व शर्ती संस्थेस बंधनकारक असतील.
४) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी नेमावे व शासन नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते, इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.
५) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पुर्तता संचालक ( तंत्रशिक्षण ) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.
६) सदर पदविका अभ्यासक्रमासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाची संलग्नता घेणे आवश्यक आहे.
७) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालके महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपुर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.
८) सदर संस्था संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहील व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांच्याकडून घेतल्या जातील.
९) सदर पदविका अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पध्दतीनुसार करण्यात येतील.

१०) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थानी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

११) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

१२) याशिवाय संचालक ( तंत्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई व महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

१३) शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी उपरोक्त अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे किंवा नवीन अटी व शर्ती अंतर्भूत करण्याचे अधिकार शासनाचे राहतील.

३. सदर शासन निर्णय राज्य शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(व्यं. ह. कुलकर्णी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नागपूर/नाशिक/अमरावती/औरंगाबाद.
संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, वांद्रे (पूर्व), मुंबई.
संबंधित संस्था
प्रत माहितीसाठी
अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, ७वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली ११०००१
विभागीय अधिकारी, पश्चिम विभागीय कार्यालय, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई २०.
निवड नस्ती/ तांशि ५.

शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.मान्यता २०१०/प्र.क्र.२११/१०/तांशि ५, दि.३० जून २०१०,

| अ. क्र. | संस्थेचे नांव व पत्ता | मंजूर अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने मान्यता दिलेल्या पत्र क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ६ | भोंसला एज्युकेशनल ट्रस्ट, ३१०-डी, न्यु नंदनवन, नागपूर ४४०००९,<br>भोंसला पॉलिटेक्निक, सर्व्हे नं.६५, मौजा हिंगणा वार्लींगा, अकोला-वाशिम हायवे, ता./जि.अकोला | मेकॅनिकल इंजिनिअरींग | ६० | क्र.एफ.२२-३०२०/२०१० (डिप्लोमा इंजि.), दि.३०-६-२०१० |
| | | इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग | ६० | |
| | | सिव्हील इंजिनिअरींग | ६० | |
| ७ | परमहंस रामकृष्ण मौनीबाबा शिक्षण संस्था, चिखली, जि.बुलढाणा,<br>अनुराधा पॉलि., अनुराधा नगर, चिखली, जि.बुलढाणा | सिव्हील इंजिनिअरींग | ६० | क्र.एफ.२२-३१३५/२०१०, दि.३०/६/२०१० |
| | | इलेक्ट्रॉ.ॲंड टेलिकम्युनि.इंजि | ६० | |
| | | मेकॅनिकल इंजिनिअरींग | ६० | |